सरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दुरध्वनी क्र. ०२२ २४१२३१११

कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना/भरती कामकाज),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
पोलीस आयुक्त कार्यालय, डॉ. डी.एन.रोड, बृहन्मुंबई ४०० ००१

ई-मेल – desk9.mum@mahapolice.gov.in

---

आ.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/ 994/२०२२.

दि. 26 / 09 /२०२२.

## नियुक्ती आदेश

प्रति,
फरहान असलम सैय्यद,
छाती क्र. ८०७७.

विषय :- मुंबई पोलीस शिपाई भरती- २०१९
पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती.
संदर्भ :- दि. ०५/०१/२०२२ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली अंतरिम निवड यादी.

संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार आपली मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१९ प्रक्रियेंतर्गत मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई पदावर तात्पुरती निवड झालेली असुन, आपली खालील अटी व शर्तींच्या अधीन राहुन दि. 26/०९/२०२२ पासुन पोलीस शिपाई पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.

१. अंतरिम गुणवत्ता यादीनुसार आपली **खुला (सर्वसाधारण)** या प्रवर्गातुन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली आहे.

२. आपण नियुक्तीवर हजर झाल्याच्या दिनांकापासुन आपले वेतन एस-७ या वेतन श्रेणी मधील रु. २१७००-६९१०० देय राहील.

३. अंतरिम गुणवत्ता यादीनुसार आपली निवड गणुवत्तेनुसार जरी **खुला (सर्वसाधारण)** प्रवर्गातुन झाली असली तरी आपण सादर केलेल्या आवेदन अर्जामध्ये **खुला (सर्वसाधारण)** प्रवर्गाचा दावा केलेला असल्यामुळे उक्त मागासवर्गीय आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार जात प्रमाणपत्र पडताळणी बाबतची पुर्तता करणे आपणास अनिवार्य व बंधनकारक आहे, अन्यथा भविष्यात आपणास सदर प्रवर्गातून पदोन्नतीचा लाभ देय होणार नाही.

४. अ) मागासवर्ग प्रवर्गातून निवड झालेल्या उमदेवारास महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ नुसार त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने, नियुक्ती आदेश स्विकारलेल्या दिनांकापासुन ०६ महिन्यांच्या आत त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घ्यावी. अशा उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करुन जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत न चुकता तात्काळ निम्न स्वाक्षरीकारास (कक्ष-९, कनिष्ठ आस्थापना) सादर करणे बंधनकारक राहील.

४. ब) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीबाबत शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि. १८/०५/२०१३ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कारवाईबाबत निर्देश नमूद केले आहेत. (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० हा कायदा दि. १८/१०/२००१

CS CamScanner